विशेष तपास पथक (SIT) स्थापन करणेबाबत.
बी.टी. कापूस बियाणांमध्ये परवानगी नसलेले तणनाशकाला सहनशील असणारे जीन (Herbicide Tolerant Transgenic Gene) आढळून आल्याप्रकरणी चौकशी करणेकरीता.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: बियाणे १०१७/प्र.क्र.१९४/१अे

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०७ फेब्रुवारी, २०१८.

वाचा:-

१) केंद्र शासनाचे दिनांक १०/०१/२०१८ रोजीचे गोपनीय अ.शा.पत्र क्रमांक ९८/AM.

२) कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक:- एनओसी २०११/प्र.क्र.३७८/१अे, दिनांक १७.११.२०१२.

प्रस्तावना:-

बियाणांसंदर्भात, "बियाणे अधिनियम १९६६", "बियाणे नियम, १९६८" व "बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३" हे केंद्र शासनाचे कायदे व राज्य शासनाचा "महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन), अधिनियम २००९" व "महाराष्ट्र कापूस बी-बियाणे (पुरवठा, वितरण, विक्री व विक्रीच्या किंमतीचे निश्चितीकरण यांचे विनियमन), नियम २०१०" हे कायदे लागू होतात.

२. भारतामध्ये व्यावसायिक स्तरावर विक्रीसाठी जनुकीय परिवर्तीत पीक (Genetically Modified Crop) म्हणून फक्त बी.टी. कापूस बियाण्याला पहिल्यांदा सन २००१-०२ च्या दरम्यान मान्यता देण्यात आलेली आहे. जून, २०११ पूर्वी जनुकीय परिवर्तीत पिकांच्या (Genetically Modified Crops) क्षेत्रिय चाचण्या घेण्यास, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वने मंत्रालयाच्या अधिपत्त्याखालील Genetic Engineering Appraisal Committee (GEAC) मार्फत विविध कंपन्यांना ना हरकत प्रमाणपत्रे दिली जात असत. तथापि, अशा प्रकारच्या चाचण्या घेण्यास काही राज्यांनी विरोध केल्यामुळे केंद्र शासनाने जनुकीय परिवर्तीत पिकांच्या क्षेत्रिय चाचण्या घेण्यास मंजूरी देताना संबंधित राज्य शासनाचे "ना हरकत प्रमाणपत्र" (No Objection Certificate) प्रथम प्राप्त करून घ्यावे व तद्नंतरच क्षेत्रिय स्तरावर जनुकीय परिवर्तीत पिकांच्या चाचण्या घेण्यात याव्यात, या अटीचा समावेश केला. त्यामुळे, जून २०११ पासून Genetic Engineering Appraisal Committee (GEAC) मार्फत ज्या ज्या कंपन्यांना क्षेत्रिय स्तरावरील जनुकीय परिवर्तीत पिकांच्या चाचण्या घेण्यास मंजूरी देण्यात आली, त्या त्या कंपन्यांनी राज्य शासनाच्या कृषि विभागाकडे ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता अर्ज करण्यास सुरूवात केली. त्या अनुषंगाने संदर्भ क्रमांक २ मध्ये नमूद दिनांक १७.११.२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये डॉ. अनिल काकोडकर, पदसिद्ध प्राध्यापक, अणु ऊर्जा विभाग, डॉ.होमी भाभा अणुसंशोधन केंद्र, ट्रॉम्बे, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु, तसेच, संशोधन संचालक आणि आयुक्त, कृषि यांचा समावेश असणारी एकूण १० सदस्यांची "राज्यस्तरीय सल्लागार समिती" गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती मार्फत प्रस्तावांची छाननी झाल्यानंतर, सदर समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने, शासन मान्यतेने, क्षेत्रिय स्तरावरील जनुकीय परिवर्तीत पिकांच्या चाचण्या घेण्यास मान्यता देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आलेली आहे.

३. भारतामध्ये व्यावसायिक स्तरावर विक्रीसाठी जनुकीय परिवर्तीत पीक म्हणून फक्त बी.टी. कापूस बियाणाला (Cry१Ac हे जीन्स असलेले बी.जी.-१ प्रकारच्या वाणाला) पहिल्यांदा सन २००२ मध्ये मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच, सन २००६-०७ पासून Cry१Ac आणि Cry२Ab हे जीन्स असलेले बी.टी. कापूस बी.जी.-२ वाण विक्री करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

४. बी.टी. कापसाच्या बियाणांमध्ये परवानगी नसलेले तणनाशकाला सहनशील असणारे जनुक (Herbicide Tolerant Transgenic Gene) वापरून बियाणांची अवैध विक्री होत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. एखाद्या बियाणे उत्पादक कंपनीला केंद्र शासनाने बियाणे अधिनियम, १९६६ च्या तरतुदी अंतर्गत अधिसूचित केलेले अथवा अधिसूचित नसलेले परंतु संशोधीत जनुकीय परीवर्तीत (Genetically Modified) वाण व्यापारी तत्वावर उत्पादित करावयाचे असल्यास प्रचलित कार्यपद्धतीनुसार अशा कंपनीने Genetic Engineering Appraisal Committee (GEAC) यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. GEAC ने प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने संशोधीत जनुकीय परीवर्तीत (Genetically Modified) वाण व्यापारी तत्वावर उत्पादित करण्याची मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्र राज्यात विक्री करण्याकरीता कृषि आयुक्तालयाकडून मान्यता देणेबाबतची पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येते. तथापि, Herbicide Tolerant Transgenic Gene असलेले बी.टी. कापूस बियाणे विक्री करण्यास अद्याप Genetic Engineering Appraisal Committee (GEAC) ने मान्यता दिलेली नाही.

५. या प्रकारच्या कापूस बियाणांची क्षेत्रिय चाचणी केंद्र शासनाच्या Genetic Engineering Appraisal Committee (GEAC) व Central Institute of Cotton Research (CICR), नागपूर या संस्थांच्या देखरेखेखाली महिको-मॉन्सेन्टो (Mahyco-Monsanto) या बियाणे कंपनीकडून सन २००८ ते २०१० या कालावधीत राज्यात काही ठिकाणी करण्यात आलेली होती. सदर कंपनीने शेवटच्या टप्प्यात स्वत: होऊन बियाणांची व्यावसायिक उत्पादन करण्यासाठी परवानगीकरीता दिलेला प्रस्ताव मागे घेतला होता.

६. बी.टी. कापसाच्या बियाणांमध्ये परवानगी नसलेले तणनाशकाला सहनशील असणारे Transgenic Glyphosate Tolerant Trait वापरून अनेक बियाणे उत्पादक कंपन्यांनी बियाणांचे उत्पादन करून मोठ्या प्रमाणावर विकत असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे. Central Institute of Cotton Research (CICR), नागपूर या केंद्र शासनाच्या संस्थेकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार जादू, एटीएम (ATM), बलभद्र, अर्जुन, कृष्णा-गोल्ड या ५ ब्रँडेड नावाच्या बी.टी. कापूस बियाणांमध्ये Herbicide Tolerant Transgenic Gene अस्तित्वात असल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे GEAC ने मान्यता न दिलेले तणनाशकाला सहनशील असणारे Herbicide Tolerant Transgenic Gene वापरल्यामुळे पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत नियमांचे उल्लंघन झालेले आहे. या प्रकारच्या बियाण्यांचे उत्पादन देशातील अनेक राज्यातील कापूस उत्पादक कंपन्यांकडून अनधिकृतरीत्या होत असल्याचे समजते. याप्रमाणे अनधिकृतरीतीने उत्पादित Transgenic Glyphosate Tolerant Trait बियाणांची विक्री महाराष्ट्र राज्यातही होत आहे. अनधिकृतपणे होणाऱ्या, तणनाशकाला सहनशील असलेल्या, कापूस बियाण्यांच्या विक्रीच्या अनुषंगाने, दिनांक २५ व २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी पारशिवनी, सावनेर, नरखेड, जि. नागपूर येथे प्रथम खबरी अहवाल (F.I.R.) दाखल करण्यात आलेले आहेत. या प्रकारचा अपराध करणारी टोळी

एकापेक्षा जास्त राज्यात सक्रीय असल्याने, सदर प्रकरणी केंद्रीय गुन्हे अन्वेषन विभागामार्फत (सी.बी.आय.) चौकशी करण्याची विनंती राज्य शासनाने केंद्र शासनाला दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ रोजीच्या गृह विभागाच्या पत्रान्वये केलेली आहे.

७. बी.टी. बियाण्यांमध्ये तणनाशकाला सहनशील असणाऱ्या जीन्सचा अनधिकृतपणे समावेश करून अवैध पद्धतीने बी.टी. बियाणांची विक्री होत असल्याच्या पार्श्वभूमीवर, केंद्र शासनाने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१७ रोजी डॉ. के .वेलुथंबी यांच्या अध्यक्षतेखाली क्षेत्रिय निरीक्षण व शास्त्रीय मुल्यमापन समिती (Field Inspection & Scientific Evaluation Committee/FISEC) स्थापन केलेली आहे. सदर समितीमार्फत मुल्यमापनाचे कार्य चालू आहे.

८. आता केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भ क्रमांक १ मध्ये नमुद दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजीच्या अर्ध शासकीय गोपनीय पत्रान्वये सदर प्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना करण्याबाबत राज्य शासनाला विनंती केलेली आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन, सदर प्रकरणाची तपासणी करण्याकरीता द्विसदस्यीय "**विशेष तपास पथक**" (Special Investigation Team) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

बी.टी. कापसाच्या बियाणांमध्ये परवानगी नसलेले तणनाशकाला सहनशील असणारे Transgenic Herbicide/Glyphosate Tolerant Trait वापरून अनेक बियाणे उत्पादक कंपन्यांनी अवैधपणे बियाणांचे उत्पादन व विक्री केल्याची बाब निदर्शनास आलेली असल्याने राज्य गुप्तवार्ता विभागातील "विशेष पोलीस महानिरीक्षक" दर्जाच्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे द्विसदस्यीय "**विशेष तपास पथकाची**" (Special Investigation Team) स्थापना करण्यात येत आहे.

विशेष तपास पथक

I) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग	**- श्री. संजय बर्वे, (भा.पो.से.)**	**विशेष तपास पथकाचे प्रमुख**
II) विभागीय कृषि सहसंचालक, अमरावती	**- श्री. सुभाष नागरे**	**सदस्य सचिव**

सदर तपास पथकामध्ये निमंत्रीत सदस्य म्हणून तज्ज्ञ व्यक्तींना बोलावण्याचे अधिकार तपास पथकाचे प्रमुख यांना राहतील. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील, त्यात वाढ करण्याचे अधिकार शासनास राहतील.

कार्यकक्षा

i) केंद्र शासनाच्या दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजीच्या गोपनीय अर्धशासकीय पत्र क्रमांक ९८/AM मधील नमुद तथ्याची केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे चौकशी करणे.

ii) Mahyco Monsanto Bio Tech (India) Private Limited, Monsanto Holdings Private Limited आणि Monsanto India Limited या कंपन्यांचे Herbicide Tolerant Transgenic Gene असलेल्या बी.टी. कापूस बियाणांचा अनधिकृतपणे महाराष्ट्र राज्यात उत्पादन, साठवणुक व विक्री यामधील सहभाग/ भुमिका संबंधी चौकशी करणे.

iii) Herbicide Tolerant Transgenic Gene असलेल्या बी.टी. कापूस बियाणांचे अनधिकृतपणे महाराष्ट्र राज्यात उत्पादन, साठवणुक व विक्री करण्यामध्ये इतर बियाणे उत्पादक कंपन्यांचा सहभाग/ भुमिकासंबंधी चौकशी करणे.

iv) अनधिकृतरित्या Herbicide Tolerant Transgenic Gene असलेल्या बी.टी. बियाणांचे राज्यात उत्पादन, साठवणुक व विक्री करणाऱ्या कंपन्यांची चौकशी करून, दोषी कंपन्यांवर करावयाच्या कारवाईबाबत शिफारस करणे.

v) सदर प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांसंदर्भातील कागदपत्रांची छाननी करून अहवाल सादर करणे.

vi) सदर पथकाने अवैधरीत्या होत असलेल्या Herbicide Tolerant Transgenic Gene असलेले बी.टी. कापूस बियाणे विक्रीस कारणीभूत ठरलेल्या बाबी निश्चीत करून त्याबाबत प्रतिबंधात्मक शिफारस देणे.

vii) याप्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती भविष्यात होऊ नये, याकरिता तातडीने करावयाच्या कार्यवाहीबाबत शिफारस करणे.

२. सदर तपास पथकाने एक महिन्यात त्यांचा अहवाल शासनास सादर करावा, आवश्यकता भासल्यास अहवाल सादर करण्यास कालावधी वाढवून घ्यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०७१७३०४९८००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Bijay Kumar

Digitally signed by Bijay Kumar
DN: c=IN, o=All India Services, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=731871a9411e73e134cafe49bca5b6f3767ef2ed4f792b8ce48e93e63c9015a6, serialNumber=98cf6eb1dea7eeeba078363f523a12ebe9119b34c44f0cb5bd3484d8ad7ea4e7, cn=Bijay Kumar
Date: 2018.02.07 17:36:32 +05'30'

(विजय कुमार)

अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. मा.अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. मा. आयुक्त, राज्य गुप्त वार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. मा. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. कृषि संचालक (निविष्ठा व गुण नियंत्रण),कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.विभागीय कृषि सह संचालक, अमरावती.
११.मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.निवडनस्ती, कार्यासन १अे.